# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २१३ वा ❑ शनिवार दि.११ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

## फॅशनच्या नादात आरोग्य धोक्यात!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

फॅशन ही अशी गोष्ट आहे की लोक त्यासाठी सर्वकाही करतात. त्यांना हवामानाची किंवा त्यांच्या आरोग्याची पर्वा नाही. आता तुम्हाला वाटेल की फॅशनचा आरोग्याशी काय संबंध आहे. तथापि, आजच्या काळात फॅशनचा आरोग्याशी खूप संबंध आहे कारण फॅशन ट्रेंड तुमच्या आरोग्याला कसा तरी हानी पोहोचवत आहेत.

फॅशन फॉलो करणे वाईट नाही, पण ते फक्त तेव्हाच योग्य आहे जेव्हा ते तुमच्या आरोग्याला हानी पोहोचवत नाही. फॅशन फॉलो करताना, तुम्ही तुमच्या आरोग्याबद्दल विसरू नये. तथापि, काही लोक ट्रेंड फॉलो करण्याचे वेड लावतात आणि विसरतात की या गोष्टी त्यांच्या आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.

महिलांना किंवा पुरुषांना उंच टाचांचे किंवा स्टिलेटोचे खूप वेड असते. उंच टाचांच्या शूज घालण्यामुळे पाठदुखी, तसेच पाय दुखणे आणि सूज येऊ शकते. यामुळे संधिवात होण्याचा धोका असतो. टाचांच्या शूज घालण्यामुळे मणक्यावर नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे, एकूणच, टाचा हाडांसाठी खूप हानिकारक असू शकतात.फ्लॅट सँडल दिसायला सुंदर दिसतात पण तुमच्या पायांसाठी हानिकारक असतात. फ्लॅट सँडल तुमचे तळवे सपाट करतात, ज्यामुळे चालणे वेदनादायक होते, जसे तुम्ही आधीच अनुभवले असेल. फ्लॅट सँडल घालल्याने तुमच्या गुडघ्यांवरही परिणाम होतो.

जड कानातले घालण्यामुळे कानाचे लोब खाली ओढले जातात आणि छिद्र मोठे होते, ज्यामुळे कानात वेदना होऊ शकतात. कानातील छिद्रे वाढल्यास शस्त्रक्रिया देखील करावी लागू शकते.

स्टायलिश दिसण्याच्या फॅशनमध्ये अनेकदा आरोग्य आणि पर्यावरण धोक्यात येते, त्यामुळे कपड्यांची निवड विचारपूर्वक करणे महत्त्वाचे आहे. फास्ट फॅशनच्या कपड्यांमध्ये लेड फ़थलेट्स आणि फ़ॉर्मल्डिहाइड यांसारखे जहरी पदार्थ असू शकतात, ज्यामुळे हार्मोनल असंतुलन, कॅन्सर आणि विकासात्मक समस्या निर्माण होऊ शकतात. पुरुषांनाही त्यांच्या कपड्यांमुळे अनेक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. कमी मान असलेल्या शर्टसह टाय घालल्याने रक्ताभिसरण कमी होऊ शकते आणि डोळ्यांच्या आत दाब वाढू शकतो, ज्यामुळे मान दुखणे, मान फिरवण्यास त्रास होणे आणि पाठीच्या आणि खांद्यांच्या स्नायूंवर ताण येऊ शकता.

केसांना रंग करण्याची फॅशन सध्या जोरात सुरू आहे.स्त्री आणि पुरुष केसांना रंग लावतात.केसांना वारंवार रंगवणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते, कारण त्यामध्ये असलेल्या रसायनांमुळे त्वचेवर जळजळ, केस गळणे आणि दीर्घकाळात किडनीचे आजार, तसेच काही प्रकारचे कर्करोग होण्याचा धोका असतो. अमोनिया, पीपीडी आणि पेरोक्साइड सारखे घटक केसांच्या रंगांमध्ये हानिकारक असू शकतात. केसांच्या रंगातील काही घटकांमुळे टाळूची जळजळ किंवा खाज येऊ शकते. वारंवार रंगवण्यामुळे केस कोरडे होतात, तुटतात आणि पातळ होऊ शकतात.

दीर्घकालीन आरोग्य समस्या होत आहे किडनीचे आजार: काही अभ्यासांनुसार, वारंवार केस रंगवल्याने शरीरात विषारी रसायने शोषली जाऊन किडनीवर परिणाम होऊ शकतो, असे एका ताज्या घटनेत दिसून आले आहे. काही अभ्यासांमध्ये हेअर डाय वापरणे आणि कर्करोग यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकण्यात आला आहे, तरीही हे निष्कर्ष परस्परविरोधी आहेत.

जे लोक वारंवार केसांचे रंग वापरतात त्यांना दम्याचा त्रास होण्याची शक्यता असते.

तरुणाईमध्ये असलेल्या फॅशन आणि सेलिब्रिटींना फॉलो करण्याच्या वेडापायी एका २० वर्षीय चिनी तरुणीला आपले आरोग्य गमवावे लागले आहे. वारंवार केस रंगवल्यामुळे या तरूणीच्या शरीरात विषारी रसायने गेली. त्यामुळे किडनीचा गंभीर आजार झाला असून तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.हुआ नावाची ही तरुणी आपल्या आवडत्या सेलिब्रिटीचे अनुकरण करत असे. आपल्या स्टारने केसांचा जो रंग ठेवला आहे, तसाच रंग करण्यासाठी ती नेहमी सलूनमध्ये जाऊन केसांना रंग करत असे. दक्षिण चायना मॉर्निंग पोस्टच्या वृत्तानुसार, ती साधारण महिन्यातून एकदा केस रंगवत होती.

द टाईम्स ऑफ इंडिया ने दिलेल्या वृत्तानुसार, केस रंगवण्याचे हे वेड तिला महागात पडले. काही दिवसांतच तिच्या पायांवर लाल डाग, पोटदुखी आणि सांधेदुखी यांसारखी लक्षणे दिसू लागली. यानंतर तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, तिला मूत्रपिंडाचा विकार झाल्याचे निदान झाले.

आरोग्याला हानी न पोहोचवता फॅशन करण्यासाठी आरामदायक, नैसर्गिक फॅब्रिकचे आणि हलक्या रंगांचे कपडे निवडायला पाहिजे.जे शरीरासाठी सुरक्षित असतील आणि हवा खेळती ठेवतील. फॅशन ट्रेंड फॉलो करताना शरीराची हालचाल मर्यादित होईल असे घट्ट कपडे टाळायला पाहिजे आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करणारा दबाव टाळून स्वतःसाठी चांगले पेहराव करायला पाहिजे. केसांना नैसर्गिक रंग दिला पाहिजे.काही रासायनिक रंग त्वचेसाठी हानिकारक असू शकतात. त्यामुळे नैसर्गिक रंगांचे कपडे वापरणे अधिक सुरक्षित असते.

# दिवाळी अंकांनी अभिजात मराठी भाषेची समृद्धी वाढविली- डॉक्टर विल धारूरकर

## ज्योतिर्मय दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – दिवाळी अंकांनी गेल्या ११५ वर्षात अभिजात मराठी भाषेची समृद्धी आणि उंची सातत्याने वृद्धिंगत केली आहे विचार प्रबोधन मनोरंजन आणि ज्ञानसंवर्धनाचे कार्य दिवाळी अंकाने सातत्याने वृत्त म्हणून पूर्ण केले आहे असे मत वृत्तपत्र विद्या विभागाचे प्राध्यापक आणि माजी विभाग प्रमुख डॉक्टर विल धारूरकर यांनी व्यक्त केले

मृदगंध सभागृहात सिडको एनटू येथे आयोजित ज्योतिर्मय साहित्य या दिवाळी अंकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते प्रारंभी ज्योतिर्मयचे संपादक संजय व्यापारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले यात्रसंगी विवेकानंद विचार मंचचे अध्यक्ष विजय जोग यांनी संपादकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर शालिवाहन संशोधन मंडळाचे रमाकांत जगत व डॉ. श्यामसुंदर कुडे हेही याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात डॉ. धारूरकर पुढे म्हणाले १९०९ साली काशिनाथ मित्र यांनी मनोरंजन मासिकाचा पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला, त्यानंतर गेल्या ११६ वर्षात दिवाळी अंकांनी समाज प्रबोधनाचे कार्य सातत्याने चालविले आहे. त्यात्या वेळी समाजापुढे येणाऱ्या समस्या देशापुढील आव्हाने आणि प्रगत विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाने केलेली प्रगती अशा अनेक बाबतीत दिवाळी अंकांनी सखोल प्रकाश टाकला आहे महाराष्ट्रामध्ये मराठवाडा मौज तसेच चपराक, ऋतुरंग इत्यादी वृत्तपत्रांनी आपल्या दिवाळी अंकांचे दर्जेदार प्रकाशन करून एक श्रेष्ठ परंपरा निर्माण केली आहे.

आजही दरवर्षी महाराष्ट्रात आठशे दिवाळी अंक प्रकाशित होतात आणि ते विविध विषयावर परिसंवादाचे आयोजन करतात, दिवाळी अंकातून कथा कादंबऱ्या कविता तसेच विज्ञान-तंत्रज्ञान क्रीडा संस्कृती संगीत अशा अनेक विषयावर अभ्यासपूर्ण लेख प्रकाशित केले जातात, महाराष्ट्रातील दिवाळी अंकांची ही परंपरा आता नवी पिढी तेवढ्याच जबाबदारीने आणि तेवढ्याच उत्साहाने पुढे नेत आहे याबाबत डॉ. धारूरकर यांनी समाधान व्यक्त केले.

ज्योतिर्मयचे संपादक संजय व्यापारी यांनी त्यांच्या प्रास्तविकात ज्योतिर्मय दैनिक व दिवाळी अंक मागील भूमिका मांडली.

याप्रसंगी श्री सुधीर कोर्टीकर आणि मृदगंधचे संचालक श्री प्रशांत नानकर यांनीही आपले विचार मांडले शेवटी प्राध्यापक डॉ. कैलास अतकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले या छोटेखानी समारंभास सिडको एनटू भागातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उत्साहाने उपस्थित होते.

याप्रसंगी प्रामुख्याने सर्वश्री उल्हास देशमुख, राजेंद्र सिमंत, मकरंद गोसावी, अक्षता मुळे, मेदिनी पाटील, देवदत्त देशपांडे, जगदीश एरंडे आदि मान्यवर उपस्थित होते. ज्योतिर्मय साहित्य या दिवाळी अंकाचा हा चौथा वार्षिक अंक असून त्याच्या प्रकाशनानंतर अंकाचे चाहत्यांनी स्वागत केले.

# अमिताभ बच्चन : अभिनयाचे एक विद्यापीठ

ज्योतिर्मय साहित्य



हम जहाँ खडे होते हैं, वही से लाईन शुरू होती है, मैं आज भी फेके हूवे पैसे नही उठाता, दिवार सिनेमातील हे डायलॉग आज ही तेवढेच प्रसिद्ध आहेत. तो एक भारदस्त आवाज, जबरदस्त संवाद फेक आजही तेवढीच लोकप्रिय आहे आणि गेल्या कित्येक दशके अभिनेता म्हणून सर्वोच्य शिखरावर विराजमान असलेला ,तुमचा आमचा लाडका अमिताभ बच्चनचाआहे .

अमिताभ यांचे वय आज ८३ वर्ष पूर्ण होते आहे. आजोबा, पणजोबा या वयाच्या, या व्यक्तीला आपण आजही एकेरी नावाने संबोधतो, कारण सर्व भारतीयांच्या मनात ही व्यक्ती कायमच घर बसली आहे, इतकी जवळीक वाटते. अमिताभ हे एक तुफान वादळ आहे.

तेरे जैसे लंबु को कोण काम देगा? असे बोल ऐकून घेऊन ही अमिताभने डोक्यावर शांत बर्फ ठेवून हळूहळू अभिनय क्षेत्र काबीज केले आणि या क्षेत्रात स्वतःचे एक वेगळेच स्थान निर्माण केले,आणि सिनेसृष्टीत एवढीउंची गाठली ,की त्या उंची पर्यंत कोणी पोहचणे? अतिशय अवघड असे आहे. अमिताभचा सात हिंदुस्तानी पासून सुरू झालेला हा प्रवास अखंड आणि आजही चालू आहे.



गिरीश खं. वसेकर (देशपांडे)
नांदेड सिटी,सिंहगड रोड
पुणे ९४२२६५९४००

आनंद, जंजीर, अभिमान, बॉम्बे टू गोवा, रोटी कपडा औंर मकान, शोले, दिवार, काला पत्थर, शान, मुक्कदर का सिकंदर, याराना, कभी कभी, मि.नटवरलाल, कुली, नमक हराम, नमक हलाल,सरकार नमक हराम, गिरफ्तार, कभी खुशी कभी गम, शहेनशहा, सूर्यवंशम, भूतनाथ, पिंक, असे आणि आणखी कितीतरी हिट सिनेमे देणारा हा अभिनेता आजही नव्या नव्या सिनेमात नव्या नव्या प्रायव्हेट जाहिरातीत, शासकीय जाहिरातीत कायम दिसत असतो. अमिताभचे हे यश सहज मिळालेले नाही. अनंत अडचणी, धावपळ,दगदग

उंचीमुळे त्या काळच्या इतर अभिनेत्यांनी ठेवलेले नावे, कुली सिनेमा शूटिंग दरम्यान झालेला जीवघेणा अपघात,

सोबत आलेले काही आजार या साऱ्या गोष्टीशी लढत हा मुक्कदर का सिंकदर आजही आपला अभिनय तेवढ्याच शिताफीने, तरुणाला लाजवेल या पद्धतीने पेश करतो आहे .

मधेच राजकारण, त्यात ही हेमवती नंदन बहुगुणा सारख्या मोठ्या नेत्याला निवडणुकीत पराभूत करणे आणि निवडणुकीत निवडून येणे, आणि पुढे काही काळाने काही कारणांनी राजकारण सोडून देणे, मधेच एबीसीएल कंपनीची स्थापना, आलेले मोठे अपयश, पुन्हा नव्याने स्व:तला आर्थिक संकटातून बाहेर काढून छोट्या पडदयावर केबीसी चे मोठे यश हे फक्त अमिताभ नावाचं वादळच करू शकतं.

अमिताभ यांचा आज ८३ वा वाढदिवस आहे. ते म्हातारे नाही तर दिवसेंदिवस तरुण होत आहेत असेच म्हणावे लागेल .

मला माझ्या काव्यात अमिताभ यांना काही म्हणायचे

असेल तर मी म्हणेल,
कोण म्हणे मज म्हातारा?
मी तर अजून चमचमता तारा
दिसेल नव्या नव्या चित्रपटात
असा मी अभिनेता नवा कोरा

तर सदीच्या अश्या या महानायकाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा

आणि अमिताभ नावाचं हे अभिनयाचे विद्यापीठ, त्यांच्या वयाच्या १०० वर्ष असेच कार्यरत राहो आणि त्यांना

उदंड आयुष्य लाभो हीच माझी परमेश्वराला प्रार्थना.

## वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख-६६

नक्षत्रमालिकेतील तेवीसावे नक्षत्र "धनिष्ठा" आहे. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष 'शमी' आहे. "शमी" हा वृक्ष मूळ, वाळवंटातील असला तरी तो सदाहरित वृक्ष आहे "धनिष्ठा" नक्षत्रावर जन्म घेतलेल्या कांही जातकांच्या राशीचं नांव "कुंभ" आहे. कुंभ ही वायु तत्त्वाची रास आहे. सामाजिक बांधिलकी जपणारी व्यक्तीमत्वे या राशीची असतात. एक वेगळा विचार प्रवाह, समाजाला बदलवण्यासाठी ही मंडळी निर्माण करु शकतात. या राशीचा स्वामी शनि महाराज असून ही राशी पुरुष प्रधान आहे. निळा रंग या राशीचा आहे.

'शमी' या वृक्षाची पाने "बाभूळ" किंवा "खैरा "सारखे दिसतात. 'धनिष्ठा' नक्षत्राच्या पर्यायी वृक्षाचं नांव 'अशोक' आणि धैर्यौषधी, "माका" आहे, या दोनही वृक्षांची माहिती अगोदरच्या लघुलेखां मध्ये आलेली आहेच. या नक्षत्रामध्ये ४ तारे आहेत. याची आकृती मृदंगासारखी दिसते. हे नक्षत्र ऑक्टोबर महिन्या च्या पहिल्या पंधरवड्यात रात्री ९ ते ११ च्या दरम्यान डोक्यावर दिसते.

या नक्षत्राची देवता "वसू" किंवा "गंधर्व" आहे. असे ग्रंथांत म्हटलेले आहे की पृथ्वीवरील बऱ्याच वनस्पती ह्या शापित गंधर्वच आहेत. 'गंधर्व' ही एक योनी असून त्यांचाही राहण्याचा एक 'लोक' आहे.. 'वसू' हे पृथ्वीवर वास्तव्य करणारे देव मानलेले आहेत. तैतरीय संहितेत यांची संख्या 333 दिलेली आहे. दागिने, विलासी वस्तू, उंची कपडे, उत्तम प्रतिचे खाणे व सर्व प्रकारच्या ऐश्वर्यप्राप्तीसाठी या देवतेचा मंत्रजप करावा, हा जप करतांनाच वास्तुमध्ये भिंतीवर "वास्तुशास्त्र पेंटींग 'कडे पाहीले- पाहत राहीले तर अदृश्य, चैतन्यदायी शक्ती, रंगाकारांच्या रूपाने समोरच्या पेंटींग मध्ये मध्ये असल्याने, एक सकारात्मक उर्जा दायी वातावरण निर्मिती झालेली असते. त्यामुळे लाभ होण्याच्या गतीत अधिक सुधारणा होते, असा उपभोक्त्यांनी अनुभव घेतलेला आहे.या देवतेचा मंत्र "ॐ वसुभ्यो नमः" किंवा "ॐ गंधर्वेभ्यो नमः" हा मंत्र आहे.

या नक्षत्राच्या चार चरणांचे स्वामी अनुक्रमे सूर्य, बुध, शुक्र, आणि मंगळ हे आहेत. प्रत्येक चरणा नुसार 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये बदल करावे लागतात, नक्षत्र पीडाहर मंत्र, वास्तुशास्त्र पेंटींग आणि नक्षत्र देवतेचा मंत्र या तीन गोष्टींमुळे सदर जातकांना त्यांच्या नोकरी व्यवसायात प्रगतीचे उंच शिखर गाठता येते. असे निरीक्षण आहे.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

सीताला वनवास
चाले भरतारा पाठी
त्यागला राजवाडा
साता जन्मासाठी ll२९७ll

सीताला वनवास
दैवान केला
देवाजी भरतार
जनकाच्या जानकीला ll२९८ll

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

# मोदी सरांच्या वर्गात...

**ज्योतिर्मय साहित्य**

पालकांसाठी जे मार्गदर्शन आहे, त्याचीही शीर्षके पहा

* तुमचे बोलच त्यांची प्रेरणा, पाठीवर हात ठेवून फक्त लढ म्हणा.
* मुलांचे मित्र बना, निराशेला दूरच ठेवा.
* तुमची स्वप्ने त्यांच्यावर लादु नका.

परीक्षा - एक उत्सव या पहिल्या प्रकरणात मोदीजी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणतात , सण, उत्सवांची आपण वर्षभर वाट पाहतो, तयारी करतो. या प्रसंगी माणसांकडच्या सर्वोत्तम गोष्टी बाहेर येतात. व्यक्ती आणि समाज यांच्या चांगुलपणाचे दर्शन घडते. परीक्षाही याचकरता असतात, जेणेकरून आपल्यातले जे सर्वोत्तम आहे, ते बाहेर यावे. आपल्याला आपल्या क्षमतांची जाणीव व्हावी. आणखी एका प्रकरणात ते मुलांना म्हणतात, कोणासारखं तरी व्हायचं नव्हे तर काहीतरी करून दाखवण्याचं स्वप्न पहा. आजकाल पालकांची तक्रार असते की आपला मुलगा स्क्रीन जास्त पाहतो. अभ्यास करत नाही. त्यावर बोलताना ते म्हणतात, आपल्या मुलाबरोबर तुम्ही कधी पायी लांब फिरायला गेला आहात का ? तुम्ही आपल्या मुलाला कौटुंबिक जबाबदाऱ्यांमध्ये सामील करून घेता का ? उदा. एखादा नातेवाईक रुग्णालयात असताना.

तुमचे उत्तर नाही असे असेल तर, तुमच्यात आणि तुमच्या मुलात अंतर आहे. ज्यामुळे तुमच्या मुलाला यांत्रिक उपकरणांचे व्यसन लागते आहे.




हे पुस्तक करा व शिका म्हणजेच कृतिजन्य अनुभवांवर भर देते. जेव्हा आपण एखादी नवी गोष्ट शिकतो, ती प्रत्यक्ष करून पाहिल्याने संपूर्णतः अवगत होते. याकरताच या पुस्तकात प्रत्येक मंत्रानंतर छोटया छोट्या मनोरंजक आणि रचनात्मक कृती सांगितल्या आहेत. या सगळ्यात मोदी यांची भूमिका एका परिपूर्ण शिक्षकाची आहे. अगदी पाचवी सहावीच्या विद्यार्थ्यांपासून तर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सुद्धा आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे.

शिक्षकांशी संवाद साधताना ते म्हणतात, आपण शिक्षक आहात त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांहून अधिक सक्षम होण्यासाठी प्रयत्न करा. संशोधन कधीही थांबवू नका. सर्वसामान्यांपेक्षा काहीतरी वेगळं वाचा आणि लिहा. यामुळे आपल्या वैयक्तिक जीवनात आपण पुढे तर जालच पण शिक्षक म्हणून आपल्या भूमिकेतही आपण अग्रेसर राहाल.

(क्रमशः)





दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# साधकनिरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**

साधका जवळ द्वेशाला तीळमात्र जागा नसते. साधकद्वेशाला देशोधडीला लावतो. नास्तिक पणाचे सोंग नाहीसें करतो. साधकाच्या जीवनमध्ये द्वेश, नास्तिकपणा, कुतर्क यांना अजिबात स्थान नसते. आत्मज्ञानाने साधकाचा विवेक फारच शक्तिमान बनतो,त्याच्या जोराने साधकाचा स्वस्वरूपाबद्दलचा निश्चय द्रुढ होतो. वैराग्याच्या सामर्थ्याने साधक आपल्या अवगुणांचा संहार करतो. आत्मानात्मविवेकाची भरमसाठ वाढ होण्यास आत्मज्ञान कारण होते आणि विवेक अत्यंत व्यापक झालाकीं, स्वरूपनिश्चय अत्यंत स्थिर होतो. आसक्ति ही सर्व अवगुणांची खाण आहे. एकदा का माणसाने वैराग्याला जवळ केले की साधक पदाला पोहचण्यासाठी त्याला वेळ लागत नाही.

स्वधर्माच्या आचरणानें साधक अधर्माचे सर्वस्व हिरावून घेतो. अधर्माला अस्तित्व रहात नाही. साधक सत्कर्मांनी दुष्कर्मांना हाकलून लावतो. आणि आपल्यातील सद्गुरूच्या विचारांच्या शिकवणीने अविचारांना बाजूला करतो. सद्विचारांचे सामर्थ्य एवढें आहे कीं अविचारांना तेथे टिकणें अशक्य होते.

साधक तिरस्काराला चिरडून टाकतो., तो कुणालाही तुच्छ लेखत नाही. साधकाच्या अंत:करणात द्वेशाचा लवलेशही नसतो. साधट खेदाला पायदळी तुडवतो. आत्मानंदाच्या मस्तीमध्ये खेदाची जाणीव उरत नाही. साधक क्रोधावर विजय मिळवतो. आपल्या मनातील क्रोधाचा तो समुळ नायनाट करतो.कपटाला आपल्याच मनामध्ये कुटून त्याचा मागमूस नाहिसा करतो. साधक सर्व पंचमहाभूतांना मित्रपणाने पहातो,सर्वांना आत्मवत् मानतो. जे जे भेटे भूत तया मानले भगवंत.वाईट लोकांना सन्मानाने वागवतो.

सद्गुरूची सेवा

साधक ष्याकडे धावणाऱ्या वृत्तीचा त्याग करतो. आत्मजनांची संगत सोडतो, वृत्तीला आत्मस्वरूपाकडे वळवून अखेर आत्मज्ञान करून घेतो. वृत्तीला आंतमध्ये वळवली की प्रथम अन्नमय कोशातून साधक निव्रुत्त होतो. नंतर व्रुती अंतर्मुख झाली की तो प्राणमय कोशातून निवृत्त होतो. अखेर साधक तेथून निवृत्त होतो व आनंदमय कोशांत प्रवेश करतो. तीन अवस्थांतून निवृत्त होऊन तो तुरीय अवस्थेमध्ये जातो. या अवस्थेमध्ये त्याचे साधन थांबते व तो आपोआप उन्मनीला पोहोंचतो. या अवस्थेला साधकाचा निवृत्ती मार्ग म्हणतात.

## जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ॥



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ॥ परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ॥ जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ॥ विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ॥ मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ॥ अभिमानात परमात्म्याचे विस्मरण । हें जीवपणाचें मुख्य लक्षण ॥ सुख-दु:ख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ॥ आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण ॥ आता करी शूर मन । मायेसी हटवावे आपण ॥ जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ॥ एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान ॥ ज्याच्यांत मानावें मी सुख । त्याच्यातच उद्भवतें दु:ख ॥ नराचा होय नारायण । जर न चुकला मार्ग जाण ॥ जेथे ठेवावी आस । त्याचे बनावें लागतें दास ॥ देह तो पंचभूतांचा । त्याचा भरवसा न मानावा फारसा ॥ मी तुम्हांस सांगतों हित । दृश्यांत न ठेवावें चित्त ॥ दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें ॥

परिस्थिति नसे बंधनास कारण । असे आपलेच मनाची ठेवण ॥ देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ॥ विषयाचा नाही झाला जोंवर त्याग । तोंवर रामसेवा नाही घडत सांग ॥ आपलें आत्यंतिक हित । हेंच खरा स्वार्थ जाण ॥ चित्तीं जे विषयापासून सुटले । ते आनंदासी आले ॥ रामनाम प्रेमयुक्त चाले धणी । त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ॥ द्रव्यदारावर्जित जाण । ही खरी संताची खूण ॥ सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी । त्याला नाही दुसरी सरी ॥ आल्यागेल्यास द्यावे अन्नदान । मुखानें भगवंताचें नाम । ह्दयांत रामाची प्रीति । यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ॥ न धरावी जगाची आस । तोच होऊ पाहे रामदास ॥ नामांत संत । नामीं भगवंत ॥ वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ॥ जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ॥ अगरबत्ती जळून गेली । परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ॥ संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ॥

देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ॥ ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ॥

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

**ज्योतिर्मय साहित्य**

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दृष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.

आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.

सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.

काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.

समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,

आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.

माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.

****




# सुटलेलं पोट कमी करण्यासाठी उपाय

**ज्योतिर्मय साहित्य**

आपण सुरुवातीला वजन वाढण्याकडे लक्ष देत नाहीत परंतु जेव्हा वजन जास्त प्रमाणात वाढते तेव्हा ते कमी करण्यासाठी घाम गाळत बसाव लागत. या घरगुती उपायांच्या मदतीने तुम्ही लवकर वजन कमी करू शकता.

१. कांदा, आलं, लसूण, टोमॅटो, दालचिनी या पदार्थांमुळे शरीरातील चरबी कमी होण्यास मदत मिळते.

२. आहारात मिठाचे प्रमाण जितके कमी करता येईल तेवढे करा. कारण मिठातील सोडियममुळे शरीरात पाण्याचे प्रमाण वाढते आणि लठ्ठपणा वाढतो.

३. रात्री झोपण्यापूर्वी ग्रीन टी प्यायल्यानं शरीराची पचनक्रिया वाढते. ज्यामुळं आपलं वजन कमी होण्यास मदत होते.

४. आहारात साखरेचे प्रमाण जितके कमी करता येईल तेवढे करा. साखरेऐवजी गुळ अथवा मधाचा वापर नक्कीच करू शकता.

५. आहारात नियमितपणे दही असेल तर त्यामुळे सडपातळ होता येईल. पोटाची चरबी कमी करण्यासाठी दररोज सकाळी कच्च्या लसणाची एक पाकळी खाल्यामुळे पोटावर आलेली चरबी कमी होण्यासाठी मदत होईल.

६. पूर्ण झोप झाली नाही तर वजन वाढतं. झोप चांगली झाली तर पचनक्रिया वाढते आणि अतिरिक्त चरबी वाढत नाही. सकाळी उपाशी पोटी कोमट पाण्यात एक चमचा मध टाकून घेतल्याने आपलं वजन कमी होण्यास मदत होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

७. योगा केल्याने वजन घटण्यास मदत होते. पोट कमी करण्यासाठी नौकासन योग सर्वोत्तम आहे.

कोमट पाण्यात लिंबाचा रस आणि थोडे मिठ मिसळून घ्या. दररोज सकाळी याचे सेवन केल्याने शरीरातील मेटाबॉलिजम चांगले राहाते आणि सोबतच तुमचे वजन कमी होण्यासही मदत होते.

८. वजन कमी करायचे असल्यास स्वत:ला पहाटे पायी चालण्याची सवय लावा यामुळे पोटावर आलेली चरबी कमी होण्यासाठी मदत होईल.

९. रात्री उशिरा जेवन केल्याने पोटावरील चरबी वाढते. त्यामुळे रात्री झोपण्याच्या २ तासाआधी जेवा.

१०. रात्रीचं जेवणा मध्ये हलका आहार घ्या. तेलकट, मसालेदार जेवण करू नका. झोपण्याआधी शतपावली कण्यास विसरु नका. यामुळे पोटावर आलेली चरबी कमी होण्यासाठी मदत होईल.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

मनोहारिणी त्वं च तन्वी च मेघा
तवौदार्यमेतत् प्रसिद्धं हि यत्त्वम्।
सदा पालयन्ती स्वभक्तं शिवाङ्गि
करोसीति दूरं निराकाररूपम् ।।११७।।

हे शिवांगी, तू मनोहारिणी, सुंदर व सावळी आहेस. तुझे हे औदार्य प्रसिद्धच आहे की, तू आपल्या भक्तांचे नेहमी पालन करतेस. आणि त्यासाठी निराकार रूप दूर करतेस.

विहायैव भक्तिं करोत्येव चिन्तां
मतं विस्मृतं तेन शक्तिं तथा त्वाम्।
कथं साधयेत् सः कदा कुत्र किं वै
सुधानिर्झरं ते प्रसादं विनात्र ।।११८।।

जो तुझी भक्ती सोडून चिंता करतो, तो तुला व तुझ्या शक्तीला विसरला आहे, असे माझे मत आहे. तुझ्या अमृतझऱ्याप्रमाणे असलेल्या प्रसादाविना येथे तो कसे, केव्हा, कोठे काय साध्य करू शकेल?

त्वयापालितोऽहं त्वयावर्धितोऽहं
त्वयालालितोऽहं त्वयासंस्कृतोऽहम्।
त्वया जीवितोऽहं त्वया रक्षितोऽहं
त्वया शिक्षितोऽहं त्वया नन्दितोऽहम् ।।११९।।

मी तुझ्याद्वारे पालित, वर्धित, लालित, संस्कारित, जीवित, रक्षित, शिक्षित व आनंदित आहे.

सुखं त्वं सुखस्यापि मातः प्रदेहि
धनं देहि भक्तिं समाधानमेव।
सदा ते स्वरूपं विलोक्याम्ब मुग्धो
भवामीति भाग्यं महन्मे च मन्ये ।।१२०।।

हे माते, तू सुखाचेही सुख आहेस. मला धन दे. भक्ती दे. समाधान दे. हे अंबे, तुझे स्वरूप पाहून मी सदैव मुग्ध होतो, हे माझे महद् भाग्य मी मानतो.

नेच्छा मम विरामस्य तथापि विरमाम्यहम्।
सलीलपूर्णनेत्राभ्याममम्बे नतोऽस्मि रेणुके।।१२१।।

हे माते, रेणुके, माझी विरामाची इच्छा नाही. तरीही अश्रूपूर्ण नेत्रांनी तुला नमस्कार करून थांबतो.

।। इति श्रीदेवीकृपया चन्द्रहासेन विरचितंश्रीरेणुकाशरणम् ।।

# जागतिक टपाल दिन

**ज्योतिर्मय साहित्य**

दरवर्षी ०९ ऑक्टोबर रोजी जगभरात जागतिक टपाल दिन साजरा केला जातो. १९७४ साली स्वित्झर्लंडच्या बर्न येथे युनिव्हर्सल पोस्ट युनियन () या आंतरराष्ट्रीय संस्थेची स्थापना झाली होता. याच निमित्त जगभरात ०९ ऑक्टोबर रोजी जागतिक टपाल दिवस साजरा केला जातो. या संस्थेच्या माध्यमातूनच जगभरातील देशांमध्ये टपाल सेवेचे नियम, दर आणि व्यवस्था निर्माण झाली. यामुळे पत्र, पार्सल किंवा माहिती जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात पोहोचवणे शक्य झाले.

भारतातील टपाल सेवेचा इतिहास

भारताच्या टपाल व्यवस्थेचा इतिहास खूप जुना आहे पूर्वी राजा महाराजांच्या काळात संदेश पोहोचवण्यासाठी राजदूत, धावक, घोडेस्वार यांचा वापर केला जात होता. दिल्लीच्या कुतुबुद्दीन ऐबकने आपल्या शासनकाळात संदेशवाहक व्यवस्थेला सुरु केली होती. जी व्यवस्था पुढे अल्लाउद्दीन खिलजी आणि शेरशाह यांनी विस्तारीत केली. तसेच मुघल सम्राट अकबरनेही उंट आणि धावक यांना उपयोग केल आणि डाक सुविधा अधिक विस्तारत गेली.

भारतात आधनिक टपाल सुविधेची पायाभरणी ही ब्रिटीश काळात झाली. १ ऑक्टोबर १८५४ रोजी लॉर्ड डलहौसी याने भारतीय टपाल विभागाची सुरुवात केली होती. याच दिवशी भारताचा टपाल दिवस साजरा केला जातो. या दिवशी भारतातने पहिले टपाल तिकीटही जारी केली होते. ज्यावर महाराणी व्हिक्टोरियाचे चित्र होते. पुढे भारत स्वतंत्र झाला आणि टपाल सुविधा भारतीयांच्या नियंत्रणाखाली आली.

यानंतर भारत सरकारने सर्वसामान्य लोकांसाठी अधिक सुलभ आणि उपयुक्त टपाल सेवेची सुरुवात केली. स्वतंत्र भारताचे पहिले टपाल तिकीट हे १५ ऑगस्ट १९४७ म्हणजेच भारतच स्वतंत्र्य झाला त्या दिवशी प्रसिद्ध झाले होते. या टपाल तिकीटावर ''जय हिंद'' लिहिलेले आणि तिरंगा झेडा होता. यानंतर भारताच्या टपाल विभागाने संस्कृती, परंपरा, विज्ञान, कला दाखवणारी सुंदर तिकीटे जारी केली.

आजच्या डिजिटल युगात ई-मेल, व्हॉट्सअ‍ॅप, व्हिडिओ कॉलिंग, सोशल मीडिया यामुळे पत्रलेखनाची परंपरा कमी झाली आहे. पण आजही भारतात टपाल विभागाचे महत्त्व कायम आहे. या माध्यमातून नागरिकांपर्यंकत कुरियर, पार्सल, स्पीड पोस्ट, आधार सेवा आणि ई-कॉमर्स वितरण केले जाते. अशा प्रकारे आपल्या भारतात टपाल सेवा सुरु झाली होती.




पूर्वी संपर्कासाठी मुख्यत्वे पत्रे हेच साधन असायचे. आणि कोणते पत्र आहे त्या वरून त्याचे महत्व लक्षात यायचे. म्हणजे साधे पत्र ( ज्यावर मजकूर थोडक्यात व पत्ता लिहायला जागा असायची. ) आम्ही त्याला १० पैशाचे किंवा खाकी पत्र म्हणत असू. ते उघडे असल्याने कोणीही वाचू शकत असे. त्यावर साधारण नापास असणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल असायचा. त्याची निकालाच्या आधीच्या दिवशी वाट *न बघितली* जायची. म्हणजे माझ्या घरात नको यायला असे वाटायचे. वाड्यात किंवा आपल्या भागात पोस्टमन दिसला की पोटात भीतीचा गोळा यायचा आणि पुढचा प्रसाद ( मार ) डोळ्या समोर यायचा. तो पोस्टमन घरासमोरून जायला लागला की हृदय बाहेर पडते की काय असेच वाटायचे. थोडक्यात पण महत्वाचे असे त्यावर लिहिले जायचे. कोणी गावाहून पत्र लिहायचे. ४ वाजता सुखरूप पोहोचलो. काळजी नसावी. वर सुरुवातीला ती. बाबा/ आई यांना सादर प्रणाम. व शेवटी आपला आज्ञाधारक असा मजकूर असायचा . आणि काहीही मायना नसलेले पत्र दिसले की निरक्षरांना पण कळायचे, की वाईट बातमी आहे. त्यात फक्त एकच ओळ असायची ---- व्यक्तीला देवाज्ञा झाली. आणि तेच पत्र फाडले जायचे.



*विभावरी कुलकर्णी*
*पुणे मो. ८०८७८१०१९७*

दुसरा प्रकार होता निळ्या रंगाचे आंतरदेशीय पत्र. त्यात तीन पाने लिहायला मिळायची. आणि कडा दुमडून ते सिल करता यायचे. म्हणजे आपला मजकूर सुरक्षित. सहज वाचता यायचा नाही. तसे पत्र गोल करून,बाजूची दुमड काढून वाचता यायचे किंवा उघडून परत सफाईने चिकटवता यायचे. हे उद्योग पण बाल पणात शिकले होते. अर्थात त्या साठी प्रसाद पण खाल्ला आहे. पण काही संभाव्य धोक्या पासून वाचवले पण आहे.

अजून सर्वात सुरक्षित प्रकार म्हणजे फिकट खाकी पाकीट (आम्ही त्याला पिवळे पाकीट म्हणत असू ) असायचे. त्यात मात्र आपलेच कागद लिहून ते एकदम पक्के चिकटवून पाठवता यायचे. त्यात खाजगी सुरक्षितता जास्त होती. आणि असे आपले स्वतंत्र रंगाचे, नक्षीचे पाकीट पाठवता यायचे. फक्त त्याला पोस्टाचे तिकीट लावावे लागायचे. आणि हो, त्यात सुगंधी मजकूर पण पाठवता यायचा. आमच्या घरी जेव्हा असे सुगंधी पाकीट आले होते,त्यावेळी आपल्या ताईची पसंती आली हो... असे ओरडतच पोस्टमन सगळ्यांना समजेल अशी दवंडी देत आला होता. आणि आईला म्हणाला होता. पत्र देतो पण आधी गोड बातमी साठी फक्कड चहा पाहिजे. मग आई गॅस कडे,वडील पत्राकडे आणि छोटी बहीण डोळे विस्फारून आणि वाड्यातील मंडळी कान टवकारून तयारीत होते. मी कोणत्या कोपऱ्यात होते ते मलाही आठवत नाही. पण पाकीट, आतले कागद याचा सुगंध मात्र अजून आठवतो आहे.

मुख्यत्वे सामान्य लोकांना हे तीन प्रकार परिचित असायचे. बाकीचे रजिस्टर, असायचे पण ते फार क्वचित दिसायचे. ही पत्रे पण फार निगुतीने ( तारकेट म्हणत होतो आम्ही त्याला ) सांभाळली जायची. एक वरच्या बाजूस हुक व खाली कॅरमच्या सोंगटी सारखी सोंगटी असायची. आणि येणारे टपाल दर ८/१५ दिवसांनी तारखे प्रमाणे लावली जायची. अर्थात त्यात बिले,पावत्या पण असायच्या. ती तार वरच्या हुक पर्यंत भरली की त्याचे गठ्ठे करून सुतळीने बांधून ठेवले जायचे. हे काम मला फार आवडायचे. ते सगळे लावताना त्याचे पुन्हा वाचन व्हायचे. अजूनही काही पत्रे जपून ठेवली आहेत. आणि अधून मधून ती काढून वाचून,झटकून,पुसून त्या बॅगेत कापूर घालून ठेवली जातात.

अशी पत्रे म्हणजे मला एक सुगंधी कुपी वाटते. कडू,गोड आठवणी असतात. आणि त्या वेळचे प्रसंग जिवंत करण्याची त्यात ताकद असते. काही भूतकाळातील वेडेपण, काही शिकवणी, काही उपदेश असे बरेच काही असते. शिवाय त्या व्यक्तीचे हस्ताक्षर असते. त्यातून पण खूप शिकायला मिळते. या सगळ्या आठवणी आजच्या ''जागतिक टपाल दिनाच्या'' निमित्ताने जाग्या झाल्या. पत्राविषयीची गाणी हा तर एक वेगळाच लेख होईल.

त्या निमित्त माझे हे जरा मोठे पूर्वीच्या भाषेत ''पाकीट'' वाचल्या बद्दल धन्यवाद!

# गरजू शेतकरी पशुपालकांना तीन लाख रुपये किंमतीच्या २२० बॅग्स पशुखाद्याची मदत

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज ऑर्गनायझेशन (बो म रे ओ ) या महाराष्ट्र बँकेतील निवृत्त कर्मचारी व अधिकारी संघटनेने ९ ऑक्टोबर रोजी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुंभेज आणि वाकाव या गावांना भेट दिली. ही गावे सीना नदीच्या काठावर असून पाऊस आणि पुराचे पाणी शेते, घरे यांमध्ये शिरले असल्याने अतोनात हानी झाली आहे. या गावांचे पावसाने दिलेल्या तडाख्याने अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी वर्गाची दैना झालीआहे. शेतीपिके, जनावरे, घरे, शाळा यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.




संघटनेचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस यांचे पुढाकाराने महाराष्ट्र बँकेतील निवृत्त कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी निधी उभारला आहे.

या निधीमधून गावातील गरजू शेतकरी वर्गाला पशुखाद्य देण्यात आले.

या प्रसंगी संघटनेचे संस्थापक बाळासाहेब फडणवीस, अध्यक्ष मोहन घोळवे, शशिकुमार चौधरी, माधव लेले, पुरूषोत्तम बापट, ॲड.पांडुरंग साळुंखे, वसंत कुलकर्णी, हेमंत अग्निहोत्री, अनिल सावंत प्रभुती पुण्याहून मुद्दाम या उपक्रमासाठी गेले होते. निवृत्त कृषी अधिकारी गणपत बाबर आणि आबा इंगळे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. गरीब आणि गरजू शेतकरी पशुपालकांना २२० बॅग्स सुग्रास पशुखाद्य संघटनेने दिले.ज्याची किंमत रुपये तीन लाख आहे.गावकरी वर्गाने या उपक्रमाचे स्वागत केले आणि बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी व अधिकारी संघटनेला धन्यवाद दिले.

# श्रद्धेच्या आड दडलेलं रहस्य 'गोंधळ' १४ नोव्हेंबरला प्रदर्शित

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या 'कांतारा'सोबत थिएटर्समध्ये प्रदर्शित झालेला 'गोंधळ' चित्रपटाचा टिझर प्रेक्षकांना भुरळ घालत आहे. काही सेकंदांच्या या टिझरने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली असून चित्रपटाची भव्यता, दमदार सिनेमॅटोग्राफी आणि तांत्रिक उत्कृष्टता लक्ष वेधून घेत आहे.

'कांतारा' आणि 'दशावतार' यांसारख्या स्थानिक संस्कृतीवर आधारित चित्रपटांप्रमाणेच 'गोंधळ'ही महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला चित्रपट आहे. कर्नाटकाच्या २० टक्के प्रदेशात 'कांतारा'मधील परंपरा पाळली जाते, तर कोकणात 'दशावतार'ला मोठे स्थान आहे. मात्र 'गोंधळ' ही परंपरा महाराष्ट्रातील तब्बल ८० टक्के भागात साजरी केली जाते, ही या चित्रपटाची मोठी ताकद आहे.

'कांतारा' आणि 'दशावतार'च्या यशाने हे सिद्ध झाले आहे की, प्रेक्षकांना आपल्या संस्कृतीशी जोडलेली, मातीचा सुगंध असलेली सिनेमॅटिक मांडणी नेहमीच भावते. 'गोंधळ'ही हाच वारसा पुढे नेत, आंतरराष्ट्रीय दर्जाचा आणि स्थानिक संस्कृतीचा सुंदर संगम सादर करणार आहे.

आपल्या भव्य मांडणीने आणि गूढ वातावरणाने टिझर प्रेक्षकांना खिळवून ठेवतो. पारंपरिक श्रद्धा, लोककला आणि आधुनिक सिनेमॅटिक सादरीकरण यांचा सुंदर संगम यात दिसत आहे. नवरा-नवरीच्या आयुष्यातील विघ्नं दूर करण्यासाठी साजऱ्या होणाऱ्या गोंधळाच्या माध्यमातून उलगडणारी ही कथा काहीतरी वेगळंच रहस्य घेऊन येते, असं टिझरमधून दिसते. काही सेकंदांची ही झलक पाहून या चित्रपटाची स्केल, टेक्निकल क्वालिटी आणि सिनेमॅटिक भव्यता स्पष्ट दिसते.

चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक संतोष डावखर म्हणतात, ' 'गोंधळ' हा चित्रपट महाराष्ट्राच्या परंपरेचं आणि श्रद्धेचं दर्शन आहे. 'कांतारा'ने जसं आपल्या लोककलेला नवा आयाम दिला, तसाच 'गोंधळ' महाराष्ट्रातील श्रद्धा, गूढता आणि परंपरा यांचं प्रतिबिंब दाखवणार आहे. आमचं उद्दिष्ट हेच होतं की ही माती, हा रंग आणि ही ऊर्जा पडद्यावर जिवंत करायची.''

डावखर फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद संतोष डावखर यांनी लिहिले असून चित्रपटाला दिग्गज संगीतकार पद्मविभूषण इल्लैयाराजा यांचे संगीत लाभले आहे. सहनिर्मात्या दीक्षा डावखर असून चित्रपटात किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहोनी, निषाद भोईर, अनुज प्रभू, सुरेश विश्वकर्मा, माधवी जुवेकर, ऐश्वर्या शिंदे, कैलाश वाघमारे, प्रभाकर मठपती, विठ्ठल काळे, प्रवीण डाळींबकर, शरद जाधव, पूनम पाटील, प्रशांत देशपांडे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १४ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.












# गोमंतकीय साहित्यात महिलांचे योगदान'' या विषयावर परिसंवाद

**ज्योतिर्मय साहित्य**

पणजी : साहित्य लेणी प्रतिष्ठान, ताळगाव व केंद्रीय साहित्य अकादमी मुबई विभागातर्फे शनिवार ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत इन्स्टिट्यूट मेनेझिस ब्रागांझाच्या परिषद कक्षात गोमंतकीय साहित्यात महिलांचे योगदान या विषयावर परिसंवाद होणार आहे.

साहित्य अकादमीचा मराठी विभागाचे केंद्रीय कार्यकारी मंडळाचे सदस्य विश्वास पाटील हे उपस्थित राहतील. व्यासपीठावर साहित्य लेणी प्रतिष्ठानच्या अध्यक्ष चित्रा क्षीरसागर व अकादमीचे प्रभारी अधिकारी ओमप्रकाश नागर हेही यावेळी उपस्थित असतील. प्रा. कृष्णाजी कुलकर्णी यांचे बीजभाषण होईल.

सकाळी ११.३० वाजता मराठी कादंबरी या विषयावर गीता येर्लेकर, सारिका आडविलकर कविता व कथेवर दीपा मिरिंगकर भाष्य करतील. या सत्राचे अध्यक्षस्थान बिभिषण सातपुते भूषवतील.

अपूर्वा बेतकीकर (ललित), हेमंत अय्या ( लोकसाहित्य) व नीता तोरणे ( आत्मचरित्र व संपादन) भाष्य करतील. अध्यक्षस्थानी प्रकाश रामचंद्र क्षीरसागर असतील.

# आकाश कंदिल निर्मिती कार्यशाळा

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : आज वस्ती विभागातील म.न.पा. शाळा महाळूंगे येथे जीवन कौशल्य विकास व भगवती सेवा आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने आकाश कंदिल निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



यात ५० इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनीसहभाग घेतला होता. या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्री.भिमरावजी चव्हाण, सहशिक्षक श्री. निवृतीराव शेळकंदे यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळा यशस्वितेसाठी सर्वश्री गिरीधर राठी, डॉ.श्याम कुलकर्णी, प्रकाशदादा बोकील, श्री.व सौ. श्रीरंग कूरे, अशोक अधिकारी, वळसंगकर यांनी प्रयत्न केला. या नाविन्यपूर्ण कार्यशाळेमुळे बालकांचे हस्त कौशल्ये वृध्दींगत होण्यास मदत होईल.

# रोहिणी सतीश कोर्टीकर -मिरासदार यांची विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

भारत विकास परिषद पंढरपुरच्या अध्यक्षा, माता-बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोल्याच्या कार्यकारिणी सदस्या, विद्या विकास मंडळ प्राथमिक विद्यालयाच्या निवृत्त मुख्याध्यापिका सौ. रोहिणी सतीश कोर्टीकर -मिरासदार यांची आपटे उपलप प्रशालेच्या - विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्या बद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



सौ.रोहिणी सतीश कोर्टीकर-मिरासदार या विद्या विकास मंडळाच्या प्राथमिक विद्यालयात सुमारे ३३ वर्षे प्रेरणादायी शिक्षक म्हणून तर पाच वर्षे शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. आपल्या कार्यकाळात त्यांनी शिस्तबद्ध व एक उपक्रमशील आदर्श शिक्षिका म्हणून उल्लेखनीय सेवा केली. सौ. रोहिणीताई या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या राष्ट्रसेविका समितीच्या स्वयंसेविका आहेत. समाजातील अनेक स्वयंसेवी व सामाजिक संघटनांशी त्यांचे जिव्हाळ्याचे, सलोख्याचे संबंध आहेत. एकूणच त्यांना शैक्षणिक, शिस्तबद्ध, काटोकोर पद्धतीने सामाजिक संघटनेत कार्य करण्याचा वारसा त्यांचे वडील, प्रेरणादायी हाडाचे शिक्षक, आपटे उपलप प्रशालेचे माजी मुख्याध्यापक स्व. वि. मा. मिरासदार सर यांच्याकडून मिळाला आहे. स्व. वि. मा. सर हे विद्या विकास मंडळाचे सुमारे २४ वर्षे सचिव व काही वर्षे चेअरमन होते. आपल्या वडिलांचा प्रेरणादायी वारसा पुढील पिढीत मुलांबरोबर मुलीही उत्तमरित्या चालवू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणून सौ. रोहिणीताईंच्या सार्थ निवडीकडे पाहावे लागेल. त्यांच्या या वाटचालीत त्यांचे पती सतीश कोर्टिकर व बंधू चंद्रहास मिरासदार व डॉ. मैत्रेयी केसकर आणि त्यांचे दीर ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांची मोलाची साथ व मार्गदर्शन आहे. सध्याच्या काळात शासनाच्या सतत बदलत राहणाऱ्या शैक्षणिक धोरणांमुळे शैक्षणिक संस्था चालवणे हे कसरतीचे आहे. त्यात शैक्षणिक संस्थेचे प्रमुख होणे म्हणजे काटेरी मुकुटासारखे आहे. पण सौ. रोहिणीताई खंबीरपणे आपले पद चालवतील ही सदिच्छा, त्यांच्या पुढील कारकिर्दीस शुभेच्छा आणि मनापासून अभिनंदन..!

# ज्योतिर्मय दिवाळी अंक प्रकाशन सोहळा क्षणचित्रे...






















# स्वातंत्र्यलढ्यातील अलौकिक व्यक्तीमत्व कृष्णाजी गोपाळ कर्वे

**ज्योतिर्मय साहित्य**

१९ एप्रिल १९०४ रोजी स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर आणि त्यांचे मोठे भाऊ बाबाराव सावरकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या अभिनव भारत या क्रांतीकारक संघटनेचे सदस्य अनंत कान्हेरे, कृष्णाजी गोपाळ कर्वे उर्फ अण्णा कर्वे आणि विनायक देशपांडे यांना सकाळी ७ वाजता ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. तीनही क्रांतीकारक श्रीरोदात्तपणे फाशी गेले. अनंत कान्हेरे हे १८ वर्षाचे तरुण व अण्णा कर्वे यांचे वय २४ वर्षाचे होते तर विनायक देशपांडे हे १८८० च्या दशकात जन्मलेले. २१ डिसेंबर १९०९ रोजी नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात शारदा नाटकाचा खेळ आयोजित करण्यात आला होता. बालगंधर्व यांचा ऐन उमेदीचा काळ असलेल्या काळातील हे शारदा नाटक विशेष लोकप्रिय झालेले असे होते. हे नाटक बघण्यासाठी नाशिकचे जिल्हाधिकारी ए.एम.टी. जॅक्सन हे येणार होते. आर्थर मेसन टिपेटस जॅक्सन यांनी स्वातंत्र्य सैनिकांविषयी व क्रांतीकारकांविषयी केलेली वर्तणूक दुटप्पी आणि कठोर स्वरूपाची होती. जॅक्सनने मराठी व संस्कृत भाषा शिकून स्वतःला भारतीय परंपरेमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला पण त्याची ब्रिटीश राजवटीशी निष्ठा मजबूत होती आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा तो कठोर विरोधकर्ता होता. जॅक्सनने अभिनव भारत या संघटनेच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला होता. बाबाराव सावरकर यांनी गोविंद कवीच्या देशभक्तीत या गाण्यांचा छोटा, संग्रह छापल्याबद्दल त्यांना अटक करून चेन्नईच्या तुरूंगात जल्मठेप आणि काळ्या पाण्याच्या शिक्षेसाठी पाठवले होते. जॅक्सनने वंदे मातरम हे गाणे म्हणणाऱ्या देशभक्तांना शिक्षा दिल्या होत्या. ब्रिटीश अधिकारी विल्यमने एका टांगेवाल्याला मृत्यूपर्यंत चाबकाचे फटके देऊन मारहाण केल्यावर त्याला काहीही शिक्षा न देता उलट जॅक्सनने त्याचे संरक्षण केले होते. क्रांतीकारक विचारसरणी जोपासणाऱ्या युवकांवर खास नजर ठेऊन त्यांना वेगवेगळ्या स्वरूपात धमकावत त्यांना तुरूंगात पाठविण्यात कलेक्टर जॅक्सन अग्रभागी होता. स्वातंत्र्याप्रती तरुणांना प्रेरीत करणाऱ्या तांबे शास्त्रींना अडकवणार हा जॅक्सन. बाबासाहेब खरेंची वकिली सनद रद्द करून त्यांना कारागृहात धावणारा हा कलेक्टर जॅक्सन. या सर्व अमानुष कारवायांमुळे नाशिकच्या अभिनव भारताच्या शाखेतील एका वर्तुळाचे नेते कृष्णाजी केशव कर्वे (अण्णा कर्वे) व विनायकराव देशपांडे यांनी अनंत कान्हेरे या युवकास सहाय्यक राहण्याचे ठरवून २१ डिसेंबर १९०९ रोजी नाशिकच्या विजयानंद थिएटरमध्ये कलेक्टर जॅक्सन याला कंठस्नान घालावयाचे निश्चित केले. कलेक्टर जॅक्सन त्या सुमारास नाशिकहून बदलून जावयाचा होता, त्याच्या सन्मानार्थ २१ डिसेंबरला शारदा नाटकाचा किर्लोस्कर नाटक मंडळींचा प्रयोग ठेवण्यात आला होता.

बाबाराव सावरकरांना दिलेल्या काळ्या पाण्याच्या शिक्षेचा बदला हे एकमेव उद्दिष्ठ घेऊन निघालेले अनंत कान्हेरे, कृष्णाजी कर्वे व विनायक देशपांडे नाशिकच्या विजयानंद नाट्यगृहात पूर्ण शस्त्रसज्जतेने हजर होते. पडदे उघडले.... नाटकाची नांदीही झाली अन इतक्यात उशीर झाला म्हणून दिलगिरी व्यक्त करत नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन आला अन पाहुण्यांच्या जागी समोरच्या रांगेत स्थानापन्न झाला. अगदी तयारीनिशी आलेल्या त्या तीन व्यक्तीही त्याला आलेला पाहून सुखावल्या. त्यांचा प्रतिशोध घेण्याचा हा दिवस होता. काट्यानेच काटा काढायचा या वृत्तीच्या या तरुणांनी जॅक्सनच्या हत्येची व्यवस्थीत योजना आखली होती. तिच्या अंमलबजावणीची वेळ होती. अनंत लक्ष्मण कान्हेरे हा चित्रकलेचा विद्यार्थी पण एरव्ही कुंचल्यावरून फिरणारी ती बोटं आज पिस्तुलाचा चाप ओढणार होती. तिकडे मंचावर कोंडरूपातले जोगळेकर ‘‘नामे ब्राम्हण खरा असा हा....‘‘ म्हणत प्रवेश करणार इतक्यात मंचासमोरून धाड धाड असे एकामागून एक गोळ्यांचे आवाज झाले. अन नाशिकचा तो स्वातंत्र्यसैनिकांना अमानुष छळ करणारा जिल्हाधिकारी ए.एम.टी. जॅक्सन रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला. मागे बसलेल्या अनंत कान्हेरे या १८ वर्षाच्या युवकाने सुरवातीस एक गोळी आपल्या पिस्तुलाने पाठीमागून जॅक्सनवर झाडली पण ती चुकली म्हणून त्याने समोर येऊन पुन्हा चार गोळ्या झाडून त्या पापी इंग्रजी अधिकाऱ्याचा अंत केला. गोळ्यांचे आवाज ऐकताच गदारोळ माजला. या गदारोळात विनायकराव देशपांडे आणि अण्णा कर्वे सभागृहातून बाहेर पडले. अनंत कान्हेरे यांचा आत्माहुती करण्याचा प्रयत्न फसला आणि शेजारी उभ्या असणाऱ्या अधिकाऱ्याने त्यांना पकडले. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी जे अटकसत्र या घटनेसाठी राबविले त्यात गणु वैद्यासारखा दुबळा मनुष्य जो अभिनव भारत संघटनेचा सभासद होता त्यांच्या हाती लागला. त्याने सर्व कट फोडला व त्याच्या माहितीवर ब्रिटीश सरकारने उग्र दमन करून व अंगावर शहारे आणणारे अत्याचार करून महाराष्ट्रातील अभिनव भारत या क्रांतीपक्षाची पाळेमुळे खणून काढली. एकंदर ३७ तरुणांवर खटला भरून त्यांना कठोर शिक्षा देण्यात आल्या. धर्मवीर विश्वासराव डावरे व नाशिकचे विष्णुशास्त्री केळकर हे त्यापैकीच होते. कटाचे सुत्रधार म्हणून कृष्णाजीपंत कर्वे, विनायकराव देशपांडे व वीरश्रेष्ठ अनंत कान्हेरे यांना १९ एप्रिल १९१० रोजी ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. वास्तविक अनंत कान्हेरे यांनी विजयानंद थिएटरात कृष्णाजीपंत कर्वे आणि विनायकराव देशपांडे यांना ओळख दाखवली नव्हती तसेच आपल्या जबानीत त्यांचा उल्लेखपण केला नव्हता.



तो काळच असा होता.... जेव्हा प्रत्येक क्रांतीकारकाला असे वाटे की, या जन्मीचे कार्य पूर्ण करून मरण आले तरी बेहत्तर. परत जन्म याच जन्मभूमीत जल्म घेऊया आणि आपला स्वातंत्र्यलढा असाच पुढे चालवूया जन्मभूमीला पारतंत्र्यातून मुक्त होईस्तोवर. अशा सर्वोच्च बलीदानाचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे कृष्णाजी गोपाळ कर्वे उर्फ अण्णा कर्वे. भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि क्रांतीकारक अण्णा कर्वे यांचा जन्म १८८७ मध्ये नाशिक येथे झाला. त्यांनी बी.ए. (ऑनर्स) पूर्ण केलं आणि मुंबई विद्यापीठात एलएलबी साठी प्रवेश घेतला होता. शिक्षण घेत असतानाच १९०४ मध्ये स्थापन केलेल्या सावरकर बंधूंच्या अभिनव भारत या गुप्त क्रांतीकारी संघटनेचे सदस्य झाले. अभिनव भारत संघटनेचा मुख्य हेतू ब्रिटिश सत्तेविरुद्ध शस्त्रसंपन्न क्रांती घडवून स्वराज्य मिळवणे हा होता. लोकमान्य टिळकांचा प्रभाव असणाऱ्या अण्णा कर्वे यांनी ज्या टिळकांनी जहाल राष्ट्रवादाचा प्रचार केला आणि युवाशक्तीला ब्रिटीशांविरुद्ध क्रांतीकारक लढ्यासाठी झोकून देण्याचा आदर्श दिला त्यांनी टिळकांच्या विचारांनी व कलाप्रचाराने गडगडाट केला.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

अण्णा कर्वे यांचे मावसभाऊ विनायक देशपांडे यांच्याशी चांगलेच गुळपीठ चालायचे. अभिनव भारतीय संघटनेमध्ये पुढाकार घेऊन अण्णा कर्वे शस्त्रास्त्रांची जमवाजमव करणे, बॉम्बची सिद्धता करणे या कामाचे नेतृत्व करीत क्रांतीसाठी जय्यत तयारी करीत असत. देश प्रथम मग आपला संसार हा विचार उपजतच असणाऱ्या अण्णा कर्वे यांनी सावरकर बंधूच्या संघटनेला आकार देण्याचे काम केले. स्वयंस्फूर्तीने क्रांतीसाठी धडपडणाऱ्या तरुणांना योग्य मार्गदर्शन करीत त्यांच्यामध्ये धाडस निर्माण करण्यात अण्णा कर्वे यांचे व्यक्तिमत्व अग्रेसर होते. वि.दा. सावरकरांच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करणारी

व त्यांचे बंधू बाबा सावरकर यांच्या आणि इतर सहकारी यांच्या प्रयत्नानी बंगाल, पंजाब, महाराष्ट्र, मद्रासपर्यंत उफाळलेली स्वातंत्र्यलढ्याची ही क्रांतीगंगा न अडवली तर मोठे क्रांतीयुध्द पेटण्याचा संभव ओळखून ब्रिटीश सरकारने दडपशाहीचे पाऊल उचलले.

२८ फेब्रुवारी १९०९ रोजी मुंबईला बाबाराव सावरकरांना पकडून त्यांच्या विरुद्ध कवितांच्या पुस्तकाचे फुसके निमीत्त करून राजाविरुद्ध बंड करण्याच्या आरोपाखाली खटला भरला. हे कार्य इतक्या गुप्तपणे चाललेले होते कि, कल्पना असूनही सरकारला पुरावा मिळत नव्हता. ८ जून १९०९ ला न्यायाधीश केनेडी यांनी त्याना कोणताही पुरावा नसता १२१ व्या निर्बंध क्रमानुसार जन्मठेप काळेपाणी शिक्षा व सर्व मिळकतींच्या जप्तीची दारुण शिक्षा सुनावली. १ जुलै १९०९ रोजी लंडन येथील जहांगीर हॉलमध्ये भारतमंत्र्यांचे सल्लागार सर कर्झन वायली यांना ठार करून मदनलाल धिंग्रा या क्रांतीकारकाने प्रत्यक्ष ब्रिटीशांच्या साम्राज्य राजधानीत बाबाराव सावरकरांना दिलेल्या शिक्षेचा सूड घेऊन दाखविला. ज्याप्रमाणे मदनलाल धिंग्राने ब्रिटीश साम्राज्यसत्तेला तिच्या अंतपु:रातच रक्ताची तीट लावली तरी, ज्याने बाबाराव सावरकरांना ही क्रूर शिक्षा भोगावयास भाग पाडले त्याला दंड होणे आवश्यक होते. औरंगाबाद येथील आर्टस स्कूलचा विद्यार्थी अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्या अंतःकरणाला मात्र सावरकरांची ही दारूण शिक्षा नागदंशाप्रमाणे वेदना देऊ लागली. मी एकटाच जॅक्सन याला यमसदनाला पाठवितो. मला साथीदार नकोत असे अनंत कान्हेरेचे पत्र अण्णा कर्वेना मिळाले. आणि त्यांनी अनंत कान्हेरेशी चर्चा करण्यासाठी आपला विश्वासू मावसभाऊ विनायक देशपांडे यांना औरंगाबादला पाठविले. अनंत कान्हेरे यांचीशी बोलणे झाल्यावर दुसऱ्या दिवशी ते नाशिकमध्ये दाखल झाले. कट रचला गेला. प्रथम अनंत कान्हेरे वार करतील आणि जर जॅक्सन त्यातून सूटला तर अण्णा कर्वे स्वतः आणि विनायक देशपांडे सज्ज राहून त्याच्यावर हल्ला करतील. पण ती वेळच आली नाही. कान्हेरेनी वेळ साधली आणि सगळ्यांच्या देखत दुष्ट जॅक्सनला यमसदनी पाठविले.

कृष्णाजी कर्वे हे विद्यमान ब्रिटीश राजवटीविरुद्ध स्वराज्य मिळवण्याच्या जहाल क्रांतीकारक चळवळीचे अग्रेसर होते. त्यांनी स्वराज्याच्या दिशेने शस्त्रसंपन्न क्रांतीला मोठे प्रोत्साहन दिले. त्यांचे बलीदान भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात अत्यंत महत्वाचे आहे. कृष्णाजी कर्वे हे असामान्य बुद्धिवंत, विद्वान व शिस्तप्रिय होते. परंतु त्यांनी आपल्या बुद्धीमत्तेचा वापर ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध संघर्षासाठी केला. त्यांनी लोकशाही, स्वराज्य व क्रांतीकारी स्वातंत्र्यसैनिक चळवळीचे आदर्श आत्मसात केले होते. अभिनव भारत संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी ते चर्चासत्रे घेऊन त्यांना प्रबोधन करीत असत. महात्मा गांधी यांच्या आधीच भारतात स्वराज्याच्या मुलभूत संकल्पना कृष्णाजी कर्वे यांनी प्रचारात आणल्या होत्या. जॅक्सन यांच्या हत्येने ब्रिटिश सुव्यवस्थेला लाथ मारली. कृष्णाजी कर्वे, अनंत कान्हेरे आणि विनायक देशपांडे यांच्या फाशीने संपूर्ण मुंबई प्रांत आणि देशभरातील स्वराज्यवादी चळवळीला मोठा धक्का बसेल असा अंदाज ब्रिटीशांना होता. पण प्रत्यक्षात या बलीदानाने विशेषतः बंगाल प्रांतात केलेल्या फाळणीविरोधात प्रचंड मोठ्या प्रमाणात ब्रिटीश अधिकाऱ्यांना ठार मारण्याचे सत्र चालू झाले व बंगालची फाळणी ब्रिटिशांना रद्द करावी लागली. तिघाही स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ ठाणे तुरूंगात स्मारक स्थापन करण्यात आले आहे. जिथे त्यांची फाशी झाली होती. या स्मारकामुळे त्या काळातील क्रांतीकारकांच्या बलीदानाची आठवण आजही ताजीतवानी राहते. कृष्णाजी गोपाळ कर्वे या अदभुत व्यक्तिमत्वाला सलाम.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559